INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# गौतमाबाईसाहेब बारगळ–होळकर यांचे मराठी कादंबरीतून आलेले स्वभाव चित्रण

**डॉ. संदीप वाकडे**

एस. एम. जोषी कॉलेज हडपसर, पुणे

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-87926929/IRJHIS2107005

**प्रास्ताविक :**

गौतमाबाईसाहेब या खानदेषातील सुलतानपूर मधील "तळोदे" येथील भोजराज बारगळ यांच्या कन्या होत. भोजराज बारगळ हे सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मातोश्री "जिवाई" यांचे बंधू होत. म्हणजे मल्हारराव होळकर यांचे मामाश्री. मामा भोजराज बारगळ यांचीच मुलगी गौतमाबाई यांचे लग्न सुभेदार मल्हारराव होळकर यांच्याषी झाले होते. पुढे लग्नानंतर मल्हारराव होळकर यांच्या प्रत्येक सुख–दु:खात गौतमाबाई खंबीरपणे साथ देत होत्या. आयुष्यातले ऊन, पाऊस एकत्र सहन करीत एकमेकांना समजून घेत, त्यांनी पुढे आयुष्यभर साथसोबत केली. अषा या मराठी कादंबरीतून आलेले गौतमाबाई यांच्या स्वभावाचे विविध पैलू आपण प्रस्तुत लेखात अभ्यासणार आहोत.

**अहिल्यादेवी होळकर यांच्या मार्गदर्शक :**

गौतमाबाईसाहेब या हजरजबाबी, धाडषी, 'त' म्हणता 'ताकभात' ओळखणाऱ्या होत्या. सुभेदार मल्हारराव होळकर व गौतमाबाई होळकर यांचे चिरंजीव पराक्रमी खंडेराव होळकर होत. तर पुत्र खंडेराव यांची धर्मपत्नी अहिल्यादेवी होळकर या त्यांच्या आदर्ष सूनबाई होत. अहिल्यादेवी या होळकर घराण्यात आल्या तेव्हापासून सासू गौतमीबाईसाहेब या त्यांना आपल्या लेकीप्रमाणे मानत होत्या. योग्यवेळी सल्ला, मार्गदर्षन करत होत्या. अषा या सासू–सासऱ्यांच्या सान्निध्यात लहान अषा अहिल्यादेवी घडत होत्या. हुषार बनत होत्या. सांगितलेली प्रत्येक गोष्ट आत्मसात करत होत्या. लग्न होवून होळकर घराण्यात आल्यापासून अहिल्यादेवी या सासू गौतमाबाईसाहेबांच्या मार्गदर्षनाखाली वावरत होत्या. अषा या गौतमाबाई सून अहिल्यादेवी यांना लेकीप्रमाणे माया लावीत, त्यांना कधीही अंतर देत नव्हत्या. पण काही चुकले तर त्या योग्यवेळी खडे बोलही सूनावत असत. हे आपल्याला पुढील प्रसंगावरून समजते.

अहिल्याबाई, रखमाबाई व सीताबाई या जेव्हा चुलावणावर तांब्याचा हंडा तापत असता, चुलवणापाषी या तिघीजणी षेकत होत्या, त्यावेळी लाकडे चुलवणाबाहेर जळत असता, अहिल्यादेवींचे त्याकडे दुर्लक्ष झाले, पण सासू गौतमीबाई यांच्या ते लक्षात आले तेव्हा त्या म्हणतात, "चुलवणातली लाकडं बाहेरच्या बाहेर जळून चाललीत. फुकट लाकडं जाळून कसं चालेल? अग, बायकांनी संसारात काडीकाडीने जपावं, साठवावं तेव्हाच माडी उभी

राहते. अहिल्ये, अगं तू आता माझ्या मागे या वाडयाची देखभाल करणार. अषी उधळमाथळ नाही चालायची. नोकर माणसांवर नाही सोपवून चालत. धन्यानं जातीनं लक्ष द्यावं लागतं"[1] अषा या बारिकसारिक गोष्टीची जाणीव करून देऊन गौतमाबाई सून अहिल्यादेवी यांना घडवीत होत्या. चार समजुतीच्या गोष्टी सांगत होत्या. हे वरील बोल सुनावत असता ते ऐकलेले मल्हारराव आपल्या या लाडक्या सुनेला बोलावून तिची समजूत काढताना म्हणतात की, "मघाषी तुमच्या सासूबाई तुम्हाला बोलल्या. ऐकलं आम्ही ते. गोठयातल्या गाईच्या दर्षनासाठी आम्ही आलो होतो. मघाषी येताना डोळयांत पाणी तरळलं तुमच्या. पण खरं सांगू , वडीलधारी माणसं जे षिकवतील ते मनापासून षिकावं, ध्यानात ठेवावं. बाई, तुझ्या सासूला हा एवढा व्याप संभाळायचा, सगळयांचं दुखलं, खुपलं बघायचं. कुणाला काही कमी पडता कामा नये. मग सांग नीट जपून, काटकसरीनं वागायला हवं का नाही? उधळमाधळ करून चालायचं नाही पोरी. जरा बस बघू. आम्ही चार गोष्टी सांगतो ऐक जरा"[2] असे म्हणून ते आपल्या या नऊ–दहा वर्षांच्या सुनेची समजूत काढतात.

**मल्हारराव होळकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहतात :**

गौतमाबाईसाहेब यांना राजकारणाची चांगली जाणीव होती. मल्हारराव होळकर यांनाही काही काही वेळेस त्या राजकारणातही सल्ला देत असत. त्या त्यांच्या पाठीषी खंबीरपणे उभ्या राहत असत. अषा या आपल्या धर्मपत्नीविषयी मल्हाररावही आपली सून अहिल्यादेवी यांना सांगतात की, "सूनबाई ह्या पगा तुमच्या सासूबाई. होळकरांची दौलत टिकली आहे ती आमच्या समषेरी पायी नाही तर, त्यांच्या सत्वषीलपणामुळे."[3] यावरून गौतमाबाईसाहेबांचा स्वभाव लक्षात येतो. पती मल्हारराव यांच्या पाठीमागे त्या खंबीरपणे उभ्या राहिलेल्या दिसतात.

**सून अहिल्यादेवी यांना आईप्रमाणे माया लावली :**

कुंभेरीच्या वेढयावेळी पुत्र खंडेराव यांचे तोफेचा गोळा लागून निधन होते. तेव्हा गौतमाबाईसाहेब या मनोमन दुःखी होतात. पुढे सती जावयास निघालेल्या सून अहिल्यादेवी यांना त्या सती न जाण्याविषयी विनवणी करतात, पण अहिल्यादेवी ऐकत नाहीत असे समजताच, त्या मल्हारराव यांना सांगतात, तेव्हा मल्हारराव सुनेला सती जाऊ देत नाहीत. एकूणच होळकर घराण्यात आल्यापासूनच गौतमाबाई यांनी आपल्या सुनेला लेकीप्रमाणे सांभाळले होते. त्या आईप्रमाणे माया लावत होत्या. त्यांच्या या मायेने अहिल्यादेवी यांनीही सासू चांगली नसते. हे विधान मनातून काढून टाकले होते. त्या म्हणतात, "खरंच माझ्यावर माया करतात त्या. मी सासरी आले. आईबाबांची आठवण नाही आली कधी."[4] यातून गौतमाबाईसाहेब यांचा प्रेमळ स्वभाव नजरेस पडतो. त्यांनी सुनेला लेकीप्रमाने माया लावली.

**परखडपणा :**

पुत्र खंडेराव होळकर यांच्या निधनानंतर मन खंबीर करून वावरणाऱ्या गौतमाबाई यांना मात्र पती मल्हारराव हे जेव्हा एकूलत्या–एक पुत्राच्या निधनाने खचून चाललेले दिसतात. तेव्हा त्या त्यांना म्हणतात, "तरूण विधवा सून दुःख गिळून राजकारणात मन गुंतवते आहे, हे जाणून घट्ट मनानं उभं रहावं, आलेल्या प्रसंगांना हसत तोंड देऊनच जगायला पाहिजे."[5] यातून त्यांच्या परखड स्वभावाची कल्पना येते. गौतमाबाईसाहेब धीराने त्यांची समजूत काढीत असत, सल्ला देत असत, त्यांचे कडू बोलही त्यांना गोड वाटत इतके त्यात ममत्व.

**सून अहिल्यादेवी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहतात :**

पती खंडेराव यांच्या निधनानंतर सती न गेल्याचे दुःख अहिल्यादेवी यांना राहून राहून होत असे, तेव्हा त्या

सासू गौतमीबाईसाहेबांना (बायजींना) म्हणतात. 'बाईजी माझं काय चुकलं का?' यावर बायजी म्हणतात, ''पोरी, असले विचार मनातून काढून टाक. होळकरांचं राज्य वाढव, प्रजेस सांभाळ, असा न्याय कर की स्त्रिया तुझा जयजयकार करतील.''[6] अषाप्रकारे त्या आपल्या सुनेला समजावतात, तिचा खचलेला आत्मविष्वास वाढवितात व तिला तिच्या भावी जबाबदारीची जाणीवही करून देतात. गौतमाबाईसाहेब पुढे स्वाऱ्या–मोहिमांवर जाणाऱ्या मल्हारराव होळकर यांच्या मागे कारभार पाहणाऱ्या, आपली सून अहिल्यादेवी यांना त्या वय झाले असतानाही जास्त काम पडू नये, म्हणून वाकलेली पाठ ताठ करून उभ्या राहतात.

एकूणच गौतमाबाईसाहेब सतत स्वाऱ्या–मोहिमांवर असणाऱ्या मल्हारराव होळकर यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या राहत होत्या. सून अहिल्यादेवी यांना घडवीत होत्या. गौतमाबाईसाहेब यांना पेषव्यांनी तीन लाख रूपये उत्पन्नाची जमीनीची सनदही दिलेली होती.

**अहिल्यादेवी यांचा वडीलधारा आधार नाहीसा होतो :**

स्पष्टवक्त्या, प्रेमळ स्वभावाच्या, वेळ प्रसंगी सुभेदार मल्हारराव यांनाही सल्ला देणाऱ्या, सुनेवर लेकीप्रमाणे प्रेम करणाऱ्या, धार्मिकवृत्तीच्या गौतमाबाईसाहेब (बायजी) पानिपतानंतर झालेल्या मराठयांच्या दुर्दषेने खचून जातात, आपल्या पराक्रमी पतीला झालेले दुःख त्यांना सहन होत नाही. पुढे अषातच त्यांचा 'दम्या'चा आजार बळावत जावून 29 सप्टेंबर 1761 रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने अहिल्यादेवी यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो. त्यांचा वडीलधारा आधार नाहीसा होतो.

त्यांच्या या जाण्याने मल्हारराव होळकरही व्याकूळ होऊन ते हरकूबाई यांना म्हणतात की, "गौतमा! गौतमा! गौतमाच होती. तिची सर कुणालाच येणार नाही. आमच्या आयुष्याला आकार दिला तो गौतमानेच. आज आम्ही उभे आहोत ते त्यांच्यामुळेच!"[7] प्रत्येक पराक्रमी पुरूषाच्या पाठीमागे जषी स्त्री असते तषीच गौतमाबाईसाहेब मल्हारराव होळकर यांच्या पाठीमागे ठामपणे उभ्या होत्या. 'गौतमपुरा' व 'गौतमपूर' ही इंदौर येथील गावे गौतमाबाईसाहेब यांच्या कर्तुत्वाची साक्ष देतात. अषा या कर्तृत्ववान पत्नी गौतमाबाईसाहेब यांच्या निधनामुळे सुभेदार मल्हारराव होळकर यांना प्रचंड दुःख झाले.

अषा या गौतमाबाईसाहेब होळकर यांच्या स्वभावाचे मराठी कादंबरीतून आलेल्या चित्रणांतून धागेदोरे उलगडता येतात.

**संदर्भ सूची :**

1. सहस्त्रबुध्दे नलिनी, 'राजयोगिनी', अनुपम प्रकाषन, पुणे, प्रथमावृत्ती, 31 मार्च,1976, पृ.क्र.47.

2. तत्रैव., पृ.क्र.47.

3. केणेकर मुक्ता, 'लोकराझी अहिल्याबाई होळकर', कॉन्टिनेन्टल प्रकाषन, पुणे, प्रथमावृत्ती, 2013, पृ. क्र.31.

4. सहस्त्रबुध्दे नलिनी, 'राजयोगिनी', अनुपम प्रकाषन, पुणे, प्रथमावृत्ती 31 मार्च,1976, पृ.क्र.92.

5. देसाई नयनतारा, 'महिष्मती', गीता एजन्सीज, सोलापूर, नवीन आवृत्ती, 26 जाने, 2007, पृ.क्र.64.

6. काळे गोविंद, 'बेलभंडार', लोकमंगल मैत्र प्रकाषन, सोलापूर, द्वितीय आवृत्ती, 26 सप्टें, 2011, पृ.क्र. 30.

7. काळे चांगदेव, 'सुभेदार', सुदर्षन प्रकाषन, मुंबई, प्रथमावृत्ती, 27 मार्च, 2009, पृ. क्र. 519.